श्री.यु.पी.एस.मदान, भाप्रसे (१९८३) (स्वेच्छा सेवानिवृत्त) यांची मुख्यमंत्री सचिवालयात विशेष सल्लागार म्हणून करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एईओ-१०१९/प्र.क्र.२६१ /२०१९/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **१०.०५.२०१९**

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ०८.०१.२०१६
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ०२.०३.२०१६
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६
४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक २१.०२.२०१८

प्रस्तावना:-

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे असणारा कामाचा व्याप लक्षात घेता, त्यांना प्रशासकीय कामकाजामध्ये योग्य सल्ला देण्यासाठी राज्याच्या प्रशासनात प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीची करार पध्दतीने मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालयात 'विशेष सल्लागार' पदावर नियुक्ती करण्यासंदर्भातील बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

श्री.यु.पी.एस.मदान, भाप्रसे (१९८३), मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांच्या दिनांक ०८.०५.२०१९ च्या विनंती अर्जास अनुसरुन, सामान्य प्रशासन विभाग आदेश क्रमांक अ.शा.पत्र क्र.एईओ-१११९/प्र.क्र.२५८/२०१९/दहा, दिनांक १०.०५.२०१९ अन्वये दिनांक १३.०५.२०१९ (म.पू.) पासून भारतीय प्रशासन सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

या शासन निर्णयान्वये श्री.यु.पी.एस.मदान, भाप्रसे (१९८३) (स्वेच्छासेवानिवृत्त) यांना ते मुख्यमंत्री कार्यालयात रुजू होतील त्या दिनांकापासून मा.मुख्यमंत्री यांचे 'विशेष सल्लागार' म्हणून करार पध्दतीने नियुक्त करण्यात येत आहे.

२. सदर करार पध्दतीने नियुक्तीच्या संदर्भातील अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहतील,-

१. श्री.यु.पी.एस.मदान, भाप्रसे (१९८३) (स्वेच्छासेवानिवृत्त) यांना सेवानिवृत्तपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

२. श्री.यु.पी.एस.मदान, भाप्रसे (१९८३) (स्वेच्छासेवानिवृत्त) यांना मुख्य सचिवांना अनुज्ञेय असणारे इतर भत्ते / सोयीसुविधा अनुज्ञेय असतील.

३. सदर नियुक्ती मा.मुख्यमंत्री यांचे पुढील विवक्षीत आदेश प्राप्त होई पर्यंत किंवा उपरोक्त शासन निर्णयातील करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा यापैकी जे आधी घडेल इतक्या कालावधीसाठी राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१३११२८४१८९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.05.14 13:41:49 +05'30'

(सीताराम कुंटे)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग,
५. उप सचिव (प्रशासन), मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा अधिकार, मुंबई
८. सामान्य प्रशासन विभाग / ९, ९-अ, व १०, १९,-२१अ व २१ रोख, २२, २३-अ,
९. मुख्य सचिवांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
१०. निवड नस्ती.